# स्थळपहाणी अहवाल

दि.२९/०६/२०११

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंन्ट ऑथोरिटी (MCZMA) यांचेकडील दिनांक २४/०६/२०११ चे पत्राचे अनुषंगाने आज दिनांक २९/०६/२०११ रोजी सकाळी ११.०० वा. स्थळपहाणी करण्यात आली. स्थळपहाणीचे वेळी उपविभागीय अधिकारी अलिबाग, तहसिलदार अलिबाग, मंडळ अधिकारी, श्रीम.हेमा रमाणी, Bombay Environmental Action Group, श्री.जेकब, रा. सासवणे तसेच ॲग्रोटेक कंपनीचे श्री.रसाळ व श्री.नायर हजर होते.

अलिबागहून मांडवा जेटीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत खारलॅण्ड विभागाने बांधलेला बंधारा आहे. सदर बंधारा खारलॅण्ड विभागाने सन २००३ साली दुरुस्ती केल्याचे समजते. सदर अलिबाग मांडवा जेटी रस्त्याचे उत्तरेस अरबी समुद्र व खाडी असून दक्षिणेस प्रॅगमॅटीक, सीसाईड, व्हीटमीन, कंन्ट्री साईड या चार कंपनीच्या नावे खरेदी केलेली ९९ एकर जमीन असून सदर जमीनी सन २००६ नंतर खरेदी केलेल्या दिसतात. सदर जमीनीमध्ये एका कोपऱ्यात ५ कंटेनर आहेत. सदर कंटेनर विटाचे कच्चे पिलर्स उभारुन त्यावर ठेवण्यात आलेले आहेत. त्यापैकी एका कंटेनरमध्ये त्या कंपनीचे कार्यालय असून एकामध्ये स्वच्छतागृह आहे. उर्वरीत तीन कंटेनरचा स्टोरेजसाठी वापरत असल्याबाबत कंपनीचे प्रतिनीधी श्री.नायर व रसाळ यानी सांगितले. सदर कंटेनर ठेवलेली जागा अंदाजे दहा गुंठे असून तात्पुरता बिनशेती वापर चालू आहे. सदर बिनशेती वापराबाबत चौकशी केली असता बिनशेती वापराबाबत दिनांक ०५/०२/२०११ रोजीचे पत्राव्दारे जिल्हाधिकारी कार्यालयास माहितीसाठी कळविल्याचे संबंधित प्रतिनीधी यांनी सांगितले आहे. पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कंपनीचे प्रतिनिधीकडे चौकशी केली असता सदर जमीनीचा कृषी संशोधनासाठी वापर करण्यात येत असल्याचे समक्ष सांगितले आहे.

सदर जमीनीमध्ये सद्यस्थितीत कोणतेही पिक नाही. पहाणीचेवेळी ट्रॅक्टरव्दारे सदर जमीनीची नांगरणी चालू असल्याचे दिसून आले. अलिबाग मांडवा जेटीलगत असलेल्या खारलॅन्ड बंधाऱ्याच्या दक्षिणेस काही भागात कांदळवन दिसून आले. अलिबाग मांडवा जेटी रस्त्यापासून कंटेनर ठेवलेल्या जागेपर्यंत अंदाजे १० फूट रुंदीचा व अंदाजे १५० मीटर लांबीचा कच्चा रस्ता केल्याचे दिसून आले आहे. सदर जमीनीमध्ये ऑरबीट मांडवा प्रकल्पाबाबत कोणताही फलक दिसून आला नाही. उपस्थित श्री.नायर यांनी सदर जमीनींचा व ऑरबीट मांडवा प्रकल्पाचा कोणताही संबंध नसल्याचे सांगून गट नं.३३४, क्षेत्र ०.४४ हे.आर. क्षेत्रामध्ये व्हिटमीन ॲग्रो प्रा.लि. कंपनीकरीता नर्सरीसाठी बीगरशेती केल्याचे सांगितले आहे.

२९/६/११

जिल्हाधिकारी रायगड